ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 9 | October - 2016

Indian Streams Research Journal

# स्वातंत्र्य आंदोलनातील जळगांव जिल्हयाची प्रारंभीक वाटचाल

डॉ. रावसाहेब भिमराव नेरकर
इतिहास विभाग , राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय, पारोळा जि जळगांव.



## प्रस्तावना:-

ईष्ट इंडिया कंपनीच्या काळात ब्रिटीशांनी आपल्या समाज व्यवस्थेतील अनेक अनिष्ट रुढी, परंपरा कायद्याने बंद केल्या. त्यामुळे प्रारंभीच्या काळात नवसुशिक्षीत वर्गाला ब्रिटीश शासन हवेहवेसे वाटत होते. सनातनी समाज व्यवस्थेचे चाललेले अन्याय, अत्याचार त्यायोगे बंद होणार होते. त्याचप्रमाणे धर्मनिष्ठ शिक्षण व्यवस्थेमुळे वैज्ञानिक दृष्टीचाही अभाव होता. ब्रिटीशांनी सुरु केलेल्या इंग्रजी शिक्षणामुळे वैज्ञानिक दृष्टी तर प्राप्त झालीच त्या सोबत पाश्चिमात्य तत्वप्रणाली समजून आली. शिक्षण, दळणवळण, आरोग्यासह अनेक क्षेत्रात आपल्या देशाची प्रगती झाली. जनतेने आधुनिकतेची कास धरली. ब्रिटीशांची शिस्तप्रियताही सुशिक्षीत वर्गाला भावली. सामान्य जनतेला जहांगिरदार, वतनदारांच्या अन्यायी, अत्याचारी चाकरीपेक्षा ब्रिटीशांची सुनियंत्रीत राजवट समाधानकारक वाटू लागली. परंतु इंग्रजांनी आपले प्रत्येक पाऊल मग ते सामाजिक सुधारणेचे असो किंवा शिक्षण विषयक असो अत्यंत सावधपणे व जपून टाकले. इंग्रजांची राजवट विविध कारणांसाठी का असेना पण अनेकांना हवीशी वाटत होती. परंतु कालांतराने विचारवंतांच्या लक्षात आले. त्यांनी साम्राज्यशाहीच्या रुपाने उदारमतवादाचे केवळ अवसान आणले. परंतु त्यामुळे त्यांचे आर्थिक शोषणाचे धोरण मात्र ते लपवू शकले नाही. ब्रिटीशांनी सुधारणावादी उपाययोजना करतांनाही आपले स्वतःचे हितसंबंध जपण्याचा प्रयत्न केला. इंग्रजांच्या काळात मानवतेच्या भूमिकेतून काम करणारेही अधिकारी होते. त्या तुलनेत मात्र अन्यायी, अत्याचारी अधिकाऱ्यांचाच भरणा जास्त होता. इंग्रजांच्या आधुनिकतेच्या धोरणांमुळे नवसुशिक्षीत वर्गात जागृती आली. त्यातून स्वातंत्र्यं, समता, बंधुत्व ही तत्वप्रणाली विकसीत होत गेली. त्यातुनच इंग्रजी सत्तेच्या विरोधात जनमत तयार होवून त्यातूनच स्वातंत्र्य आंदोलनाची दिशा मिळाली.

## ब्रिटीश सत्तेच्या विरोधात पहिला संघर्ष : -

ब्रिटीशांच्या अन्यायी, अत्याचारी सत्तेला उलथून टाकण्याच्या अयशस्वी प्रयत्न राष्ट्रीय स्तरावर इ. स. १८५७ च्या उठावाने झाला. परंतु १८५७ चा उठाव देशव्यापी होणे ही बाब अचानक झालेली नव्हती. जनतेच्या मनातील असंतोषाचा तो स्फोट होता. इंग्रजांच्या अन्याय, अत्याचाराला शह देण्यासाठी तयार झालेली मते होती. स्वातंत्र्याच्या विचाराने पेटलेली असंतोषाची ज्योत १८५७ च्या उठावाच्या रुपाने प्रकटली. इंग्रजांच्या दिवसागणीक वाढणाऱ्या अन्याय-अत्याचाराने सामान्य जनता त्रस्त झालेली होती. गुलामगिरीच्या जाचाने जनतेची गळचेपी सुरु होती. इ. स. १८५७ च्या उठावाच्या रुपाने जरी स्वातंत्र्य आंदोलन पेटलेले असले तरी त्याआधी संपूर्ण देशभर छोटीमोठी आंदोलने होत होती. या गोष्टीला खानदेश आणि त्यातल्या त्यात जळगांव जिल्हा अपवाद नव्हता. देशभर विवीध राज्यांमध्ये, जिल्हयात आणि छोटयामोठया वाडयावस्त्यातही स्वातंत्र्य आंदोलनाने पेट घेतलेला होता.

## जळगांव जिल्हयातील पहिला संग्राम :-

१८५७ च्या उठावाच्या आधीच जळगांव जिल्हयातील कास्तकरांनी ब्रिटीशांविरुध्द आंदोलन केले. जिल्हयातील स्वातंत्र्य वृत्तीच्या भिल्ल लोकांनी इंग्रजांशी प्रखर संघर्ष केला.

जिल्हयातील सावदा, फैजपूर आणि यावलच्या कास्तकरांनी ब्रिटीशांच्या विरोधात ठामपणे आंदोलन केले. या लढयाचे वैशिष्टये कोणताही नेता नाही की पुढारी नाही. प्रत्येक आंदोलनकर्ता स्वःयंप्रेरणेने या लढयात उतरला. ब्रिटीश सत्तेला हादरुन सोडणे हा एकच हेतू त्यांचा होता. या आंदोलनकर्त्यांचा कोणताही स्वार्थ नव्हता. स्वातंत्र्यासाठी प्राणपणाने लढा देणे हा एकमेव उद्येश नजरेसमोर ठेवून ते इंग्रजांविरुध्दच्या लढयात उतरले होते. जळगांव जिल्हयातील कास्तकरांनी प्रचंड इंग्रजी सत्तेविरुध्द उभारलेले हे आंदोलन निश्चितच कौतुकास्पद होते. ब्रिटीश सत्तेच्या विरोधात आंदोलन करण्याचा त्यांचा निर्धार पक्का होता. कास्तकरांच्या मनात पेटलेली असंतोषाची ज्वाला कोणीही शमवू शकत नव्हते. अन्यायी-अत्याचारी इंग्रजांच्या कोणत्याही गोष्टीस थारा द्यावयाचा नाही हा त्यांचा पक्का निर्धार होता. इ. स. १८४९ मध्ये ब्रिटीश महसूल आयुक्ताने शेतांच्या परिसीमा निश्चित करण्यासाठी शेतकऱ्यांना मोफत मोठे दगड व बैलगाडया पुरविण्याचा आदेश दिला. परंतु स्थानिक शेतकऱ्यांनी महसूल आयुक्तांच्या आदेशाला तीव्र विरोध केला. आयुक्ताच्या आदेशाने रावेर, सावदा, चोपडा सर्वेक्षण काम सुरु होताच इ. स. १८५२ मध्ये पुन्हा मोठा संघटित निषेध केला. महसूल अधिकारी जे. व्ही. डेव्हीडसन यावल याठिकाणी तंबूत असतांना जवळपास दोन ते तीन हजार कास्तकरांनी तंबूला घेराव घातला. महसूल आयुक्ताच्या आदेशानुसार सर्वेक्षण कामासाठी सरकारला मजूर साधनसामुग्री विनामूल्य पुरविण्यास नकार दिला. महसूल अधिकारी परत न गेल्यास तंबू नष्ट करण्याची धमकी दिली. या घटनेने ब्रिटीश अधिकाऱ्यांचे धाबेचं दणाणले. महसूल आायुक्ताने तात्काळ धुळयातील अधिकाऱ्यांचा व धरणगावच्या सेनादलाच्या अधिकाऱ्यांना मदतीसाठी पाचारण केले. यावल मधील शेतकरी वर्गाची असंतोषाची वार्ता सर्वदूर हवेसारखी पसरली. पुणे येथील घोडदळ व धरणगावचे सेनादल मुलकी अधिकाऱ्यांच्या बरोबर यावलला पाठविण्यात आले. शेतकऱ्यांचे इंग्रजांच्या विरुध्द पेटलेले हे आंदोलन मुलकी अधिकाऱ्यांनी सर्वेक्षण तहकूब करण्याचे व शासन पातळीवर निर्णय घेण्याचे आश्वासन दिल्यावरच शांत झाले.

### फैजपूर येथील शेतकऱ्यांचे आंदोलन :-

महसूल अधिकारी डेव्हीडसन याने जमीन सर्वेक्षणच्या कामी मजूर, साहित्य मोफत पुरविण्याचा जो आदेश काढला होता तो आदेश यावल या ठिकाणी शेतकऱ्यांच्या झालेल्या तीव्र आंदोलनामुळे स्थगित करावा लागला होता. त्याने लष्करी व मुलकी कुमक मागविली होती. परंतु त्यातही तो अपयशी ठरला होता. त्याला नाईलाजाने का असेना आदेश स्थगीत करावाला लागला. परंतु काहीच दिवसात त्याने सावद्यापासून ८ कि.मी. वर असलेल्या रणगांव येथे तंबू ठोकून अधिकाऱ्यांची व सैन्याची जमवाजमव केली. त्यामुळे सावद्याचे शेतकरी पुन्हा संघटीत होवू लागले. फैजपूरला शेतकऱ्यांची मोठी संघटना उभी राहिली. शेतकऱ्यांनी जमीनीचे हे सर्वेक्षण थांबविण्याचे लेखी आश्वासन मागितले. इंग्रज अधिकाऱ्यांनी स्पष्ट नकार दिल्यामुळे शेतकऱ्यांनी तंबूला घेराव घातला व तंबू नष्ट केला. या प्रसंगी शेतकरी अतिशय आक्रमक होते. ब्रिटीश अधिकाऱ्यांना पलायन करावे लागले. आंदोलनकर्त्या जमावाने मामलेदार व महसूल अधिकाऱ्यावर हल्ला चढविला. त्यांनाही जीव मुठीत घेवून पळ काढावा लागला. ब्रिटीश अधिकारी मॅन्सफिल्ड याने मालेगावचे व धरणगावचे सेनादल फैजपूरला तात्काळ पाचारण केले. परंतु मार्गावर असलेल्या एरंडोल येथे हजारो नागरीक संघटीत झाले. त्यांनी सेनादलाला कोंडीत पकडले. परंतु इंग्रजांनी तात्काळ देशी पायदळ, भिल्ल पथक, पुण्याचे घोडदळ असे प्रचंड सैन्यबल मागविले. सेनादलाने एरंडोलला देशमुख, देशपांडे , पाटलांना कैद केले. सैन्यबलाच्या जोरावर इंग्रजांनी एरंडोलचा लढा शांत केला. परंतु या घटनेचा सावदा, फैजपूरच्या आंदोलनकर्त्यांवर मात्र परिणाम झाला नाही. त्यांनी मामलेदार व इतर अधिकाऱ्यांचे आदेश धुडकावून लावले. जमीन महसूल देण्यास स्पष्ट नकार दिला. लोक पंचायत स्थापन करून समांतर शासन यंत्रणा संघटीत केली. इंग्रजांच्या आदेशाचे पालन करणाऱ्यांना त्यांनी शिक्षा ठोठावल्या. या घटनेने ब्रिटीश सरकार खडबडून जागे झाले. हे आंदोलन चिरडून टाकण्यासाठी मोठी आघाडी उभारली गेली. १६ डिसेंबर १८५२ रोजी जिल्हाधिकारी कॅप्टन विंगेट, मेजर मॉरीस प्रचंड सैन्यदलासह फैजपूर वर चाल करून गेले. त्यांनी संपूर्ण शहराला आपल्या सैन्यदलासह वेढा दिला. या अचानक कारवाईमुळे जनतेत अस्वस्थता निर्माण झाली. नेत्यांना पकडले गेले. इंग्रजांच्या प्रचंड सैन्यदलापुढे निःशस्त्र जनतेला माघार घ्यावी लागली. परंतु अशिक्षीत, सामान्य शेतकरी वर्गाने इंग्रजांसारख्या प्रचंड शक्तीच्या विरोधात प्रखर लढा दिला ही बाब निश्चितच उल्लेखनिय आहे.

### १८५७ च्या उठावातील भूमिका :-

१८५७ च्या सातमाळा परिसरातील भागोजी नाईक व सातपुडा भागातील कजरसिंग नाईक व भिमा नाईक यांच्या नेतृत्वाखली भिल्लांनी उठाव केला. भागोजी नाईक यांनी अहमदनगर जिल्हयात उठावास प्रारंभ केला, त्यांच्या या उठावाचा वणवा चाळीसगांव पर्यंत पेटलेला होता. सातपुडयातील कजरसिंग नाईकाने बंडाचे निशाण उभारुन डोंगराळ गावावर चढाई केली. इंग्रजांच्या इंदौरहून मुंबईला जात असलेला साडे सात लाखांचा खजिना कजरसिंग व भिमा नाईकाने हस्तगत केला. ३ नोव्हेंबर १८५८ रोजी तात्या टोपे खानदेशातील इंग्रजांवर चाल करून येत असल्याची बातमी इंग्रजांना मिळाली, इंग्रजांनी बऱ्हाणपूर, शिरपूर, चोपडा याठिकाणी प्रचंड सैन्यदल तैनात केले. १८५७ च्या उठावात रणरगिंणी राणी लक्ष्मीबाई धारातिर्थी पडल्या. त्यांचे झांसी संस्थान बरखास्त केले गेले. रणरागिणी राणी लक्ष्मीबाईंचा सहसंबंध असलेले पारोळा हे ऐतिहासिक शहर असून याठिकाणी हरी सदाशिव दामोदर हा जहांगिरदार होता. त्याने बांधलेला भुईकोट किल्ला कॅप्टन ब्रिग्ज ने शहराचा ताबा घेवून किल्ला उध्दवस्त केला.

स्वातंत्र आंदोलनातील पहिला स्वातंत्र्य लढा म्हणून ओळखला जाणारा १८५७ च्या स्वातंत्र्य आंदोलनाआधी सुध्दा ब्रिटीश सत्तेच्या विरोधात उभे राहण्याचे धाडस जळगांव जिल्हयातील आंदोलनकर्त्यांनी केले. जळगांव जिल्हयातील आंदोलन हे १८५७ पर्यंतच सिमित न राहता सशस्त्र क्रांतीकारी चळवळीत मोलाची भूमिका या जिल्हयाने बजावली. या काळातील भुसावळ बॉम्ब खटला विशेष गाजला. राष्टपिता महात्मा गांधीनी सुरु केलेल्या सवीनय कायदेभंग चळवळ व असहकार आंदोलनाला प्रचंड प्रतिसाद या भागातून मिळाला. चोपडा, यावल, रावेर भागात जंगल सत्याग्रह केला गेला. असहकार चळवळीचा जोमही या जिल्हयात प्रचंड होता. धनाजी नाना चौधरी, सखाराम गोपाळ शेंदुर्णीकर, निळकंठ गणेश साने, शं्कर वामन जोशी, झिपरु बुवा अशा अनेक आंदोलकर्त्यांनी ब्रिटीशांच्या विरोधात जन आंदोलन पेटविले.

स्वातंत्र्य आंदोलनाच्या सुरुवातीच्या पायरीपासूनच जळगांव जिल्हयात इंग्रजांच्या विरोधात प्रचंड असंतोषाचे वातावरण होते.

**सारांश :-**

ब्रिटीश सत्ता म्हणजे ईश्वरी वरदान हे शब्द परंपरागत अनिष्ठ रुढी परंपरांच्या जाचातून समाज मुक्त होण्यापुरतेच रुचणारे होते. इंग्रजी सत्तेचे पाश जेव्हा आमच्या सामाजिक, सांस्कृतीक, धार्मिक आणि राजकीय शक्ती भोवती आवळले जावू लागले. आमच्या हक्क आणि अधिकारांची जेव्हा पायमल्ली होवू लागली. ब्रिटीश सत्ता म्हणजे आपल्या मानगुटीवर बसलेले भूत वाटू लागले. या पाशवी शक्तीचा समूळ नायनाट करण्यासाठी जन आंदोलनाने पेट घेतला. तो केवळ मुंबई, पुण्यासारख्या महानगरामधूनच नव्हे तर जळगांव जिल्हयातील डोंगर माथ्यावरील आदिवासी समाजापासून, शेतकरी वर्गापर्यंत हे आंदोलनाचे लोण पसरले. ब्रिटीश सत्तेच्या अत्याचाराच्या शृंखला तोडण्यासाठी कुठल्याही प्रकारचे सैन्यदल, शस्त्रास्त्र नसतांना केवळ प्रचंड आत्मविश्वास, प्रखर राष्ट्रप्रेमाने प्रेरीत झालेली जनता हे ब्रिटीश सत्ता उलथून टाकण्यासाठी सज्ज झाली. परिणामस्वरुप आपण १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्याची पहाट पाहू शकलो.

**संदर्भ :-**

१. चौधरी कि. का. (संपादक) - महाराष्ट राज गॅझेटिअर (महाराष्ट शासन)
२. भनसाळी डी. एम. - संपुर्ण खानदेश डिरेक्टरी
३. कर्वे चिंतामण गणेश, जोगळेकर, जोशी - महाराष्ट परिचय अर्थात संयुक्त महाराष्टाचा ज्ञानकोश.
४. पाटील भी. ना. - खानदेशातील समाज प्रबोधनाची चळवळ.